# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),**
**ता.जि. ठाणे, 401 101.**

25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

**जा.क्र.मनपा/आस्था/1255/2026-27** **दि.30/09/2026**

विषय :- दुष्काळग्रस्तांना मदत करण्याच्या अनुषंगाने अधिकारी/कर्मचारी यांचे 01 दिवसाचे वेतन कपात करणेबाबत.

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन, मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्रमांक- समिती-2026/प्र.क्र.82/मदत-2, दि.25 सप्टेंबर, 2026.

2. जा.क्र.मनपा/आस्था/1251/2026-27, दि.30/09/2026 रोजीचे परिपत्रक.

## <u>सुधारीत परिपत्रक</u>

सन 2026 च्या खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या 265 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाय योजना व सवलती लागू करणेबाबत संदर्भिय शासन निर्णय आहे.

सदर पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त नागरिकांना मदत करण्याच्या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून मा.महापौर महोदया यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य कार्यालयात बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस मा.आयुक्त, मा.उपमहापौर, मा.स्थायी समिती सभापती, मा.सभागृह नेता. मा.सभापती (विविध समिती) तसेच सर्व महानगरपालिका विभागप्रमुख उपस्थित होते. बैठकीमध्ये महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्या स्वेच्छेने एक दिवसाच्या वेतनाचे योगदान दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी देण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने महानगरपालिकेतील वर्ग-01 ते वर्ग-04 मधील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतन त्यांचे स्वेच्छेने कपात करणेसाठी तयार असतील अशा अधिकारी/कर्मचारी यांची माहिती विभागप्रमुख यांनी आस्थापना विभागात कळविण्यात यावी. सदर अधिकारी/कर्मचारी यांचे एक दिवसाचे कपात करण्यात येणारे वेतन "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" मध्ये जमा करण्यात येईल.

30/09/2026

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(म.आयुक्त यांचे निर्देशान्वये)

प्रति,
सर्व अधिकारी/कर्मचारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-
विभागपमुख (सर्व)
/- सदरचे परिपत्रक आपले अधिनस्त कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे.